# ..... प्रार्थना ....

## प. पू. श्री रामचंद्र शंकर टाकी उर्फ श्रीभाई रचित

आर्या

ब्रह्मां–विष्णु–महेशा ! तुमचीं आहोंत दत्तजी ! बाळें ।
जतन करा सर्वस्वें देउनि सद्भाव मृत्युसी आळें ।।१।।
'यशवंत' नाम तुम्हां 'यश' गुण तुमचाच द्यावया लावी ।
यश गातां यश लाभे दासां जे भक्तिपंथही दावी ।।२।।

## प. पू. श्री मंगेश रामचंद्र टाकी उर्फ श्रीदादाभाई रचित

धावा

घाली पंखाखाली सद्गुरुमाउली । करोनि साउली कृपेचीगे ।।ध्रु.।।
लोटू नको दूर पक्षहीन बाळा । येऊं दे कळवळा जननीये ।।१।।
चंचूपुटे घाली मुखांत कवळ । घेऊन जवळ पाजी पान्हा ।।२।।
नको ज्ञानवृद्धि परिपाक आम्हा । धेनुवत्स प्रेमा देईदेई ।।३।।
मागो हेचि दान देई कृपामूर्ती । अखंडित प्रीती जडोपायी ।।४।।

## प. पू. श्री नारायण महाराज जालवणकर रचित

आरती

गुरूराया रे ! करीं दया राम ।।ध्रु.।।
अनाथ दिनानाथ सद्‌हृदया, विठ्ठला ! ।।१।।
जपतपध्यानधारण साधन न करीं काय उपाया, विठ्ठला ! ।।२।।
कामक्रोध रे मत्सर पीडिती, न चले काय उपाया, विठ्ठला ! ।।३।।
विश्वंभर हे त्रेमूर्त्यात्मक, आदि नारायण राया, विठ्ठला ! ।।४।।